**Programme on Hindi Ghazal on the Occasion of Hindi Week**



जळगाव : हिंदी सप्ताहाचे उद्घाटन करताना डॉ. मधू खराटे. शेजारी प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख, डॉ. राहुल संदानशिव.

# प्रेम, आनंदोत्सव, तर कधी वंचितांचे जळजळीत वास्तव म्हणजे हिंदी गझल

जळगाव : 'गजल आकर्षित करती है, हम अपने आप को ढुंढते है ! मै गजल सुनाकर चुपचाप अलग खडा हो गया, लोग अपने चाहने वालों को ढुंढने मे खो गये! अशी गजलची आपलेपणा दाखवणारी ओळख करून देत, 'कधी प्रेम, कधी आनंदोत्सव, तर कधी वंचितांचे जळजळीत वास्तव' म्हणजे हिंदी गझल. असे विचार हिंदी गजल समिक्षक डॉ. मधू खराटे यांनी येथे मांडले. येथील नूतन मराठा महाविद्यालयात हिंदी भाषा सप्ताहानिमित्त झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख अध्यक्षस्थानी होते. हिंदी विभाग प्रमुख डॉ. राहुल संदानशिव या वेळी उपस्थित होते. डॉ. आफाक शेख यांनी परिचय करुन दिला. डॉ. खराटे यांनी गजल सर्व सामान्यांचा हुंकार आहे असं सांगताना विविध गजल सादर करत कार्यक्रमाला एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले. दरम्यान, सप्ताहानिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यात विजेत्या विद्यार्थ्यांना पुस्तकं बक्षीस देऊन गौरविण्यात आले. तर, सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. प्रा. मुक्ती जैन यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. तेजस्विनी पाटील यांनी आभार मानले.